**महाराष्ट्र शासन**

क्र.आव्यप्र/२०२१/प्र.क्र.१२/आव्यप्र-१
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:२९ /०१ /२०२१

प्रति,

आयुक्त (बृन्हमुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई विरार, कल्यान डोंबिवली, मिरा भाईंदर, भिवंडी निजामपूर, पनवेल व उल्हासनगर महानगरपालिका)

पोलिस आयुक्त (मुंबई, ठाणे, नवी मुंबई व मिरा भाईंदर वसई विरार)

जिल्हाधिकारी (मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर व रायगड)

मुख्य कार्यकारी अधिकारी (ठाणे, पालघर व रायगड)

पोलिस अधिक्षक (ठाणे ग्रामीण, पालघर व रायगड)

मुख्याधिकारी (सर्व, एम.एम.आर. क्षेत्र)

**विषय** – मुंबई व एम.एम.आर. क्षेत्रात सर्वांकरीता लोकलसेवा सुरु करण्याबाबत

१) सर्व प्रवाश्यांसाठी मुंबई व एम.एम.आर. क्षेत्रात लोकल प्रवासाकरीता दिनांक ०१ फेब्रुवारी २०२१ पासून खालील प्रमाणे परवानगी देण्यात येत आहे.

अ) दिवसाच्या पहिल्या लोकल पासून सकाळी ०७.०० वाजेपर्यंत.

आ) दुपारी १२.०० वाजेपासून दुपारी ०४.०० वाजेपर्यंत.

इ) रात्री ०९.०० वाजल्यापासून शेवटच्या लोकलपर्यंत.

२) सकाळी ०७.०० वाजल्यापासून ते दुपारी १२.०० व संध्याकाळी ०४.०० ते रात्री ०९.०० या कालावधीत फक्त यापूर्वी परवानगी देण्यात आलेल्या प्रवर्गातील प्रवाश्यांना प्रवास करता येईल.

३) उपहारगृहे रात्री ०१.०० वाजेपर्यंत व सर्व दुकाने रात्री ११.०० वाजेपर्यंत सुरु ठेवता येतील.

४) मात्र दुकाने व आस्थापनांकरीता कमाल ३०% कर्मचाऱ्यांची अट व उपहारगृहे, फुड कोर्ट इत्यादीसाठी वेळो वेळी निर्गमित करण्यात आलेल्या मानक कार्यप्रणाली (SOP) कायम राहतील.

५) सर्वांकरीता विहित वेळेत लोकल प्रवासाची सुविधा लक्षात घेता त्याप्रमाणे कार्यालयीन वेळा ठरविण्याबाबत सर्व आस्थापना व कार्यालयांना विनंती करण्यात यावी.

(संजय कुमार)
मुख्य सचिव
महाराष्ट्र शासन